जा.क्र. जिपऔ/कृषी १२/डॉ. बा. आं. कृ. स्वा. यो/२०१९/७७८
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक : २२/०८/२०१९

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०१९-२०

## बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना सन २०१९-२०

कृषी विभाग, जिल्हा परिषद औरंगाबादमार्फत सन २०१९-२० या वर्षात वरील योजनेतून लाभ प्रदान करण्यासाठी पात्र अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी लाभार्थ्यांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. खालील अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या इच्छुक लाभार्थ्यांनी **www.agriwell.mahaonline.goc.in** या महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर दि. ०५/०८/२०१९ ते ०४/०९/२०१९ या कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर करून त्याची प्रत पंचायत समितीस सादर करावी.

**योजनेचे नाव व उद्दिष्ट :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे.
२) बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेद्वारे अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे.

**पात्रतेचे निकष :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना लाभासाठी अर्जदार अनुसुचित जाती/ नवबौद्ध प्रवर्गातील असावा (जातीचे प्रमाणपत्र आवश्यक)
२) बिरसा मुंडा कृषी क्रांतीयोजना लाभासाठी अर्जदार हा अनुसूचित जमाती प्रवर्गातील असावा (जातीचे प्रमाणपत्र आवश्यक)
३) जमिनीचा ७/१२ व ८ अ चा उतारा आवश्यक.
४) वार्षिक उत्पन्न रुपये १५००००/- च्या मर्यादित असावे (सन २०१८-१९ उत्पन्नाचा दाखला आवश्यक)
५) लाभार्थ्यांची जमीन धारणा ०.२० हे. ते ६ हेक्टरपर्यंत असावी (नवीन विहिरीच्या लाभासाठी किमान ०.४० हे. आवश्यक)
६) सामुहिक शेतजमीन किमान ०.४० हेक्टर धारण करणारे एकत्रित कुटुंब नवीन विहिर या घटकाचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरतील.
७) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेच्या लाभार्थ्यांस प्राधान्य.
८) आधार कार्ड असणे आवश्यक आहे.

### अनुदानाच्या बाबी :

| बाब | महत्तम अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|
| •नवीन विहिर | रुपये २,५०,०००/- |
| •जुनी विहिर दुरूस्ती | रुपये ५०,०००/- |
| •इन वेल बोअरिंग | रुपये २०,०००/- |
| •पंपसंच | रुपये २०,०००/- |
| •वीज जोडणी आकार | रुपये १०,०००/- |
| •शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकर | रुपये १०,०००/- |
| •सुक्ष्म सिंचन संच | ठिंबक रुपये ५०,०००/ किंवा तुषार रुपये २५,०००/-मर्यादित |
| •पीव्हीसी/एचडीपीई पाईप | रुपये ३०,०००/- |
| •परसबाग | रुपये ५००/- |

**वरील बाबींचा लाभ खालीलपैकी एका पॅकेजच्या स्वरुपात देय राहिल :**

१) **नवीन विहिर पॅकेज** - नवीन विहिर, पंपसंच, वीज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक यासाठी एकूण रुपये ०.३.०५ ते ३.३० लक्ष.
२) **जुनी विहिर दुरुस्ती पॅकेज** - जुनी विहिर दुरुस्ती, पंपसंच, वीज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक यासाठी एकूण रुपये १.०५ ते १.३० लक्ष.
३) **शेततळ्याचे प्लास्टीक अस्तरीकरण पॅकेज** - शेततळ्याचे प्लास्टीक, अस्तरीकरण, पंपसंच, विजजोडणी आकार, तुषार किंवा ठिंबक यासाठी एकूण रुपये १.५५ ते १.८० लक्ष.
४) **इतर पॅकेज** - ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी शासकीय योजनेतून विहिर घेतली असेल किंवा स्वखर्चाने विहिर बांधली असेल अशा शेतकऱ्यांना वीज जोडणी आकार, पंपसंच व सुक्ष्म सिंचन संच या घटकाचा लाभ देय राहिल.
(टिप : परसबाग व पीव्हीसी/एसडीपीई पाईप या घटकाचा लाभ फक्त बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना देय आहे. अर्जदाराकडे जर काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकांचा लाभ विहिर मर्यादेत देण्यात येईल.)

**अंमलबजावणी यंत्रणा व अधिक माहितीसाठी संपर्क :**

कृषी विभाग, पंचायत समिती आणि कृषी विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद.

digitaldg.in

**वरील जाहीरातीतील योजनेच्या सविस्तर माहितीसाठी खालील लिंकवर क्लिक करा**

https://digitaldg.in

https://www.youtube.com/digitaldg